**पडताळणी**

**मी देवाशपथ खरे सांगतो की, माझे नाव अजीत लक्ष्मण लहाने आहे. माझे पुराव्याच्या शपथपत्रातील संपुर्ण मजकूर खरा व बरोबर असुन त्यावर माझी सही आहे.**

**<u>अधिक सरतपास वादीतर्फे विधिज्ञ श्री. आर. बी.सावंत यांचेमार्फत</u>**

०६. आता मला नि.क्र.४८ वरील दि.१६.०२.१९९८ रोजीचा साठेकरार दाखवला. त्यावर वादीने व प्रतिवादींनी सहया केल्या. तसेच मी व दिलीप पंदीलकर, रामचंद्र घोगले, हरीभाऊ दळवी व विश्वनाथ धामणसे असे सर्वांनी साक्षीदार म्हणुन सहया केल्या. आता मला दाखवलेल्या सदर साठेकरारातील दस्तावर पान क्र.५ वरील क्रमांक ४ ची सही माझी आहे. त्यावरील इतरांच्या सहया देखील मी ओळखतो.

**<u>उलटतपास प्रतिवादींतर्फे विधिज्ञ श्री. एम. डी. पाटील यांचेमार्फत शपथेवर.</u>**

०७. कोलाड येथील नंदकुमार खंडेलोट वकिल माझ्या माहितीचे होते. ते आता हयात नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, ते साठेखत, खरेदीखत लिहिण्याचे काम करायचे. हे म्हणणे खरे आहे की, **नि.क्र.४८** वरील साठेखताचा स्टँम वादीतर्फे खंडेलोट वकिलांनी आणला होता. हे म्हणणे खरे आहे की, कोलाड येथे एखादयाला पैशाची गरज असेल तर त्याची जमीन गहाण ठेवुन पैसे देण्याची पध्दत आहे. मी साठेकरार वाचुन पाहिला आहे. हे म्हणणे खरे नाही की, अनंता घोगले यांना पैशाची आवश्यकता असलयामुळे त्यांनी दावा मिळकत वादीकडे गहाण ठेवुन पैसे घेतले होते. साक्षीदार सांगतो की, गहाण ठेवले किंवा कसे ते मला माहित नाही. या पुर्वी मी न्यायालयात साक्ष दिली नाही. माझ्या सहया खंडेलोट यांच्या कार्यालयात घेतल्या होत्या. तेथे मला वादीने बोलवले होते. साक्षीदारांपैकी मी व दळवी पुई गावाचा व इतर साक्षीदार डोलवहाळ गावचे होते. मी चार नंबरला नंतर सही केली. दस्त आठवले टायपिस्ट याने टाईप केला होता. त्यातील गाळलेल्या जागा कोणी भरल्या हे मला माहित नाही.

०८. हे म्हणणे खरे नाही की, साठेकरारावेळी मी तेथे हजर होतो, माझे समक्ष इतरांनी

तसेच मी साक्षीदार म्हणुन त्यावर सही केली असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे समक्ष अनंता घोगले याने सहया केल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत,

SANDEEP VISHNU KHAIRE
Digitally signed by SANDEEP VISHNU KHAIRE
Date: 2025.12.05 17:57:15 +0530

स्थळ : रोहा. (एस.व्ही. खैरे)
दि.०४.१२.२०२५ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, रोहा.